# जनेप प्राधिकरणाकडून  सागरी पर्यावरणाचे रक्षण करण्यासाठी मानवरहित सौर ऊर्जा बोटद्वारे जलतलावरच्या कचऱ्याचे संकलन

## गेटवे ऑफ इंडियामध्ये जेएनपीएचे अध्यक्ष श्री उन्मेष शरद वाघ, भा. रा. से. यांच्या उपस्थितीत कार्यक्रमाची सांगता

मुंबई, **2** ऑक्टोबर **2024:** भारतातील सर्वोत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या बंदरांपैकी एक असलेल्या जवाहरलाल नेहरू पोर्ट प्राधिकरणाने (जेएनपीए) बुधवार, २ ऑक्टोबर रोजी गेटवे ऑफ इंडियावर मानवरहित सौर ऊर्जा बोटद्वारे जलतलावरच्या कचऱ्याचे संकलन करण्यासाठी प्रक्षेपण केले. हा कार्यक्रम राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या जयंतीनिमित्त त्यांना आदरांजली म्हणून आयोजित करण्यात आला होता. शाश्वत पर्यावरणीय पद्धतींना प्रोत्साहन देणे आणि भारताच्या सागरी पर्यावरणाचे रक्षण करणे, ही जहाजबांधणी आणि जलमार्ग मंत्री श्री सर्बानंद सोनोवाल यांच्या दृष्टीकोनाशी ही संकल्पना सुसंगत आहे आणि जनेप प्राधिकरणाचे अध्यक्ष श्री उन्मेष शरद वाघ, भा. रा. से., यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम संपन्न झाला.

शाश्वतता आणि नैसर्गिक परिसंस्थेचे संरक्षण करण्यासाठी जेएनपीएच्या प्रयत्नांवर अधोरेखित करताना, श्री उन्मेष शरद वाघ, भा. रा. से., अध्यक्ष, जनेप प्राधिकरण, “देशाच्या सागरी अर्थव्यवस्थेचे रक्षक म्हणून आपली समुद्रे आणि परिसंस्था संरक्षित करण्याची जबाबदारी आपली आहे. या उद्दिष्टाचा एक भाग म्हणून, आम्ही एक मानवरहित सौर ऊर्जा बोट सुरू केली आहे जी आठवड्यातून दोनदा गेटवे ऑफ इंडिया येथे कचरा संकलित करेल, ज्यामुळे समुद्र स्वच्छ राहील. ही बोट एलिफंटा सागरातही स्वच्छता मोहीम राबवेल. याशिवाय, ही नाविन्यपूर्ण बोट जेएनपीएमध्येही कार्यरत राहून आपल्या किनारपट्टीच्या भागांची स्वच्छता राखेल. आधुनिक आणि शाश्वत तंत्रज्ञानाचा वापर करून पर्यावरणीय प्रयत्नांना गती देणे आणि सागरी परिसंस्थेच्या हितासाठी प्रोत्साहन देणे हे आमचे ध्येय आहे."

जेएनपीएने स्मार्ट आणि शाश्वत सागरी उपाय पुरवणाऱ्या क्लिअरबॉट टीमसोबत करार केला आहे. या मानवरहित सौर ऊर्जा बोटमध्ये अनेक आधुनिक वैशिष्ट्ये आहेत जी तिची कार्यक्षमता वाढवतात. ही बोट स्वयंचलितपणे कार्य करते आणि लिडार सेन्सर्स आणि पेटंटेड अव्हॉइडन्स तंत्रज्ञानाचा वापर करून वस्तूंना शोधून त्यांचा मागोवा घेते. हे विविध सागरी वातावरणात कार्यक्षम आणि सुरक्षित कचरा संकलन सुनिश्चित करते.

याशिवाय, या बोटीच्या सहाय्याने सातत्यपूर्ण डेटाचे संकलन केले जाते, जे सानुकूलित ऑनलाइन डॅशबोर्डवर रिअल-टाइममध्ये प्रदर्शित होते, ज्यामुळे देखरेख आणि विश्लेषण सुलभ होते. या बोटीची टिकाऊपणा वाढवण्यासाठी तिच्यात समाकलित सौर पॅनल्स बसवले आहेत, ज्यामुळे पारंपारिक ऊर्जा स्त्रोतांवर अवलंबून न राहता कार्य चालू असताना एकाचवेळी चार्जिंग देखील शक्य होते.

या बोटमध्ये ऑटो-डॉकिंग क्षमता असून ती सहजपणे डॉकिंग स्टेशनवर परतू शकते, तसेच दीर्घकाळ टिकणाऱ्या बॅटरीसह विस्तारित ऑपरेशन्ससाठी कार्यक्षम असते. क्लिअरबॉट प्रदूषण पुनर्प्राप्ती आणि तेल सांडपाणी व्यवस्थापनामध्ये उत्कृष्ट आहे, ५०० किलोग्रॅमपर्यंतच्या वजनाचे सहज हाताळते. झिरो-इमिशन ऑपरेशनच्या

माध्यमातून हे बोट पर्यावरणीय शाश्वततेच्या प्रति आपली वचनबद्धता अधोरेखित करते आणि सागरी प्रदूषणाच्या समस्यांना प्रभावीपणे सामोरे जाते.

समुद्रातील कचरा संकलनासाठी मानवरहित बोटीचे प्रक्षेपण हे जेएनपीएच्या सागरी परिसंस्थेचे रक्षण करण्याच्या वचनबद्धतेतील एक महत्त्वाचे पाऊल आहे. नाविन्यपूर्ण तंत्रज्ञान आणि शाश्वत पद्धतींचा उपयोग करून, जनेप प्राधिकरण महासागर आणि किनारपट्टीच्या क्षेत्र सुधारण्याचे, स्वच्छ आणि हिरवेगार भविष्य सुनिश्चित करण्याचे ध्येय ठेवतो.

जनेप प्राधिकरण बद्दल:

जवाहरलाल नेहरू पोर्ट प्राधिकरण (जनेप प्राधिकरण) हे भारतातील प्रमुख कंटेनर हाताळणी बंदरांपैकी एक आहे. २६ मे १९८९ रोजी स्थापना झाल्यापासून, जनेप प्राधिकरण एक बल्क कार्गो टर्मिनलवरून देशातील प्रमुख कंटेनर बंदरात रूपांतरित झाले आहे.

सध्या, जनेप प्राधिकरण पाच कंटेनर टर्मिनल्स चालवते - एन एस एफ टी , एन एस आय सी टी, एन एस आय जी टी, बी एम सी टी आणि ए पी एम टी बंदरात सामान्य मालवाहतुकीसाठी उथळ पाण्याचा बर्थ देखील आहे. जनेप प्राधिकरण पोर्टवर उपस्थित असलेले लिक्विड कार्गो टर्मिनल बीपीसीएल-आयओसीएल कन्सोर्टियमद्वारे व्यवस्थापित केले जाते. याव्यतिरिक्त, नव्याने बांधलेला किनारी धक्का इतर भारतीय बंदरांना जोडतो आणि किनारपट्टीवरील कंटेनरची वाहतूक वाढवते.

277 हेक्टर जमिनीवर वसलेले, जनेप प्राधिकरण भारतातील निर्यात-केंद्रित उद्योगांना चालना देण्यासाठी, अत्याधुनिक पायाभूत सुविधांसह, काळजीपूर्वक डिझाइन केलेले बहुउत्पादक विशेष आर्थिक क्षेत्र (SEZ) देखील चालवते.

जनेप प्राधिकरण महाराष्ट्रातील वाढवण येथे सर्व हवामानात काम करण्यायोग्य, २० मीटर नैसर्गिक खोल, ग्रीनफिल्ड पोर्ट विकसित करत आहे. हे जागतिक स्तरावरील सर्वोत्कृष्ठ १० बंदरांमध्ये स्थान मिळवणार आहे आणि स्थापनेपासून १००% हरित बंदर असेल.

मीडिया चौकशीसाठी, कृपया संपर्क साधा:
जनेप प्राधिकरण:
अंबिका सिंग
सीनियर मॅनेजर (मार्केटिंग), जनेप प्राधिकरण
मोबाईल क्रमांक: +919920372677
ईमेल: ambikasingh@jnport.gov.in

जनेप प्राधिकरण
JNPA
INDIA'S
BEST
PERFORMING
PORT

# JNPA Safeguards Marine Ecosystem with Launch of Unmanned Solar-Powered Boat for Floating Trash Collection

## The event concluded at the Gateway of India in the presence of Shri Unmesh Sharad Wagh, IRS, Chairman, JNPA

**Mumbai, October 2nd, 2024:** Jawaharlal Nehru Port Authority (JNPA)- India's Best Performing Port, launched the unmanned solar-powered boat for collecting floating trash from the ocean at the Gateway of India, on Wednesday, October 2nd. The event was organised as a tribute to the Father of the Nation, Mahatma Gandhi, on the occasion of his birth anniversary. This initiative aligns with the vision of Shri Sarbananda Sonowal, Minister of Ports, Shipping and Waterways, to promote sustainable practices and protect India's marine environment, and was carried out under the guidance of Shri Unmesh Sharad Wagh, IRS, Chairman, JNPA.

Underscoring JNPA's striving for sustainability and protecting the natural ecosystem, Shri Unmesh Sharad Wagh, IRS, Chairman, JNPA, stated, "As the guardians of the country's blue economy, it is our responsibility to protect our seas and ecosystems. To further this mission, we have launched an unmanned boat that will collect waste twice a week at the Gateway of India, ensuring a cleaner sea. This boat will also clean the Elephanta Sea. Additionally, this innovative boat will operate at JNPA to maintain the cleanliness of our coastal areas. We are committed to utilising modern and sustainable technologies to enhance our environmental efforts and promote a healthier marine ecosystem."

JNPA has a tie-up with the Clearbot team, an organisation that provides smart and sustainable marine solutions. The unmanned boat boasts several advanced features that enhance its functionality. It operates autonomously, effortlessly navigating and detecting objects using LiDAR sensors and patented avoidance technology. This ensures efficient and safe waste collection in various marine environments.

Additionally, the boat provides consistent data collection, with information displayed in real-time on a customised online dashboard, allowing for easy monitoring and analysis. To further its sustainability, the boat is equipped with an integrated solar panel that enables simultaneous charging during operation, ensuring continuous performance without reliance on traditional power sources.

The unmanned boat features auto-docking capabilities for seamless returns to docking stations and long-lasting batteries for extended operations. The Clearbot excels in pollution recovery and oil spill management, effortlessly handling loads of up to 500 kilograms. Its zero-emission operation highlights its commitment to environmental sustainability while effectively tackling marine pollution challenges.

The launch of the unmanned boat for sea waste collection marks a significant step forward in JNPA's commitment to safeguarding the marine ecosystem. By harnessing innovative technology and sustainable practices, we aim to enhance the health of our oceans and coastal areas, ensuring a cleaner and greener future.

**About JNPA:**

The Jawaharlal Nehru Port Authority (JNPA) is one of the premier container-handling ports in India. Since its inception on May 26, 1989, JNPA has transformed from a bulk cargo terminal into the premier container port in the country.

Currently, JNPA operates five container terminals - NSFT, NSICT, NSIGT, BMCT and APMT. The Port also has a Shallow Water Berth for general cargo. A Liquid Cargo Terminal present at the JNPA Port is managed by the BPCL-IOCL consortium. Additionally, the newly constructed coastal berth links other Indian ports and facilitates enhancing the traffic of coastal containers.

Nestled across 277 hectares of land, JNPA also operates a meticulously designed multi-product SEZ, with state-of-the-art infrastructure, to boost export-oriented industries in India.

JNPA is also developing an all-weather, deep-draft, greenfield port at Vadhvan, in Maharashtra. It is poised to be among the top 10 ports globally and will be 100% green port since its inception.

**For media enquiries, please contact:**
JNPA:
Ambika Singh
Sr. Manager (Marketing), JNPA
Mob: +919920372677
E-mail: ambikasingh@jnport.gov.in

जनेप प्राधिकरण
JNPA
INDIA'S
BEST
PERFORMING
PORT